क्र.महानिर्मिती/मासं(सेप्र)/ 1531 दि. 11 FEB 2020

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# सूचना

## तंत्रज्ञ-३ या पदाच्या ऑनलाईन परीक्षेतील गुणांबाबत

संदर्भ:- १) महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०१९

२) तंत्रज्ञ-३ या पदाच्या ऑनलाईन परीक्षेतील गुणांबाबतची सूचना क्र.८४९ दि.२४.०१.२०२०

महानिर्मिती कंपनीतर्फे जाहिरात क्र.०४/२०१९ अन्वये तंत्रज्ञ-३ यांची रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाद्वारे भरण्याकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर पदांची ऑनलाईन परीक्षा दि. १६, १७ आणि दि.१८.१२.२०१९ रोजी महाराष्ट्रातील विविध परीक्षा केंद्रावर पार पाडण्यात आली होती. त्यासअनुसरुन दि.२४.०१.२०२० रोजी तंत्रज्ञ-३ पदाच्या ऑनलाईन परीक्षेत प्राप्त झालेले गुण उमेदवारांच्या माहिती करीता महानिर्मिती कंपनीच्या www.mahagenco.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते.

सदर निकालात महानिर्मिती कंपनीतर्फे पात्र प्रकल्पग्रस्त प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी उमेदवारांनी ०१ वर्षे कालावधीचे प्रगत कुशल प्रशिक्षण पूर्ण केले असल्यास सदरील प्रकल्पग्रस्त उमेदवारांना त्यांच्या प्रत्येक पूर्ण वर्षाच्या प्रशिक्षणाकरीता ५ गुण अशाप्रकारे जास्तीत जास्त २५ गुण देण्यात आलेले आहेत.

तंत्रज्ञ-३ या पदाचा ऑनलाईन अर्ज सादर करणाऱ्या "प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी" उमेदवारांच्या माहितीची सत्यता पडताळणीसाठी प्रकल्पग्रस्त उमेदवारांची माहिती मुख्य कार्यालयामार्फत विविध विद्युत केंद्राकडून मागविण्यात आली होती. विविध विद्युत केंद्राकडून प्राप्त माहितीच्या आधारे ०५ ते २५ गुण हे ऑनलाईन परीक्षेत प्राप्त गुणांमध्ये मिळवून प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी उमेदवारांचे एकूण गुण उपरोक्त सुचनेव्दारे प्रसिध्द करण्यात आले होते.

परंतु दि.२४.०१.२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेच्या गुणांच्या अनुषंगाने खालील उमेदवारांनी निवेदने सादर केली होती. सदरील प्राप्त निवेदनांची पडताळणी करण्यात आली. पडताळणीअंती मा.सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या मंजुरीनुसार खालील उमेदवारांचे सुधारित गुण माहितीस्तव खालीलप्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहेत.

| अनु क्र. | उमेदवारांचा बैठक क्रमांक | प्रगत कुशल प्रशिक्षणातंर्गत प्रत्येक पूर्ण वर्षाच्या प्रशिक्षणाकरीता दिलेले गुण | सुधारीत गुण | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | १८१०००१४५२ | ० | २५ | "प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी आरक्षणातंर्गत" समाविष्ठ करण्यात येत आहे. |
| २ | १३१००००८७९ | ० | २५ | "प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी आरक्षणातंर्गत" समाविष्ठ करण्यात येत आहे. |
| ३ | १३१०००१५३२ | १५ | २० | निरंक |
| ४ | १५१००००४३२ | १० | १५ | निरंक |
| ५ | १८१०००२७५६ | ५ | २० | निरंक |
| ६ | १८१०००१८२३ | ० | ० | सदरील उमेदवाराला पदवी/पदविका धारक प्रकल्पग्रस्त प्रवर्गामध्ये "प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी आरक्षणातंर्गत" समाविष्ट करण्यात येत आहे. |

11-02-2020

(आनंद आबाराव कोंत)

मुख्य महाव्यवस्थापक (मासं)